|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि /७०५/२०२१ दि. २२/१०/२०२१

**प्रति,**

**१) मा.प्राचार्य/ संचालक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था**

**२) मा.संचालक, विभाग प्रमुख विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग**

**विषय :- विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रमाची प्रचार व प्रसिध्दी करण्याबाबत..**

महोदय/ महोदया,

आगामी महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका तसेच मतदार यादी विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम- २०२२ केंद्रस्थानी ठेवून मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा. आयुक्त राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांची दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी बैठक संपन्न झाली असून सदर बैठकीत मतदार नोंदणी वाढविणेकामी व त्याबाबत जनजागृती वाढविण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविणेबाबत निर्देशित करण्यात आल्याचे मा. प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांनी कळविले आहे.

प्रस्तूत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मतदार जनजागृती करण्याकरीता अर्धशासकीय पत्रातील निर्देशानुसार उचित कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल आपआपल्या मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, नंदुरबार/ धुळे/ जळगाव यांना सादर करावा.

आपला विश्वासू,

(डॉ. पंकजकुमार शां. नन्नवरे)
**प्र.संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत - सामान्य प्रशासन विभागाचे पत्र.**

**प्रत -**

१) विभागप्रमुख, मा.कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि, जळगाव
२) विभागप्रमुख, मा.प्र-कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि, जळगाव
३) विभागप्रमुख, मा.कुलसचिव कार्यालय,कबचौउमवि, जळगाव

D/Shivade/General letter

# [जि]ल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, जळगांव

फोन नं.-0257-2217640 Email-dydeojalgaon@gmail.com

जा.क्र./निवड-5/कावि/६८१ / 2021 दिनांक:-१८/10/2021

**मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रम – 2022**

प्रति,

1. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जळगांव
2. मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका
3. मा.कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
4. मा.विभागीय रेल्वे व्यवस्थापक भुसावळ – (AERO भुसावळ यांचे मार्फत)
5. उपजिल्हाधिकारी (महसूल प्रशासन) जि.का. जळगांव
6. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव
7. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
8. मतदार नोंदणी अधिकारी (सर्व)
9. सहा.मतदार नोंदणी अधिकारी (सर्व)
10. जिल्हा माहिती अधिकारी, जळगांव
11. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
12. गटविकास अधिकारी – सर्व
13. मुख्याधिकारी - सर्व
14. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था - जळगांव
15. कमांडंट – NCC जळगांव
16. सहाय्यक कामगार आयुक्त, जळगांव
17. समन्वयक, नेहरु युवा केंद्र, जळगांव
18. आगार व्यवस्थापक, एस.टी महामंडळ – सर्व (AERO यांचे मार्फत)

**विषय:-** विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाची प्रचार व प्रसिध्दी करण्याबाबत...

**संदर्भ :-** मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबइ यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्रमांक – स्वीप/2021/ प्र.क्र.454/21/33 दि. 05 ऑक्टोबर,2021

आगामी महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका तसेच मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम - 2022 केंद्रस्थानी ठेवून मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग मुंबई यांची दिनांक 28 सप्टेंबर, 2021 रोजी बैठक संपन्न झाली असुन सदर बैठकीत मतदार नोंदणी वाढविणेकामी व त्याबाबत जनजागृती वाढविण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविणेबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे.

संदर्भिय अर्धशासकीय पत्राची प्रत यासोबत जोडण्यात येत असुन सदर अ.शा.पत्रात नमुद मुद्यांचे अनुषंगाने आपल्या अधिनस्त कार्यक्षेत्रात मतदार जनजागृती करणेबाबत अर्धशासकीय पत्रातील निर्देशानुसार उचित कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आपला अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

**सोबत :-** संदर्भिय अर्धशासकीय पत्र

(अभिजित राऊत)

# तुम्ही १८ वर्षाचे झालात ?

## तुमचे नाव मतदार यादीत नोंदविले नसल्यास, लगेच नोंदवा !

### हे सर्व तुम्ही कसे कराल ?

**नविन मतदार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे**

- फॉर्म पूर्णपणे भरुन त्यासोबत एक फोटो, ओळखपत्र व रहिवासी पुरावा जोडा.

**ओळखपत्र**

- पॅन कार्ड, जन्माचा दाखला, ड्रायव्हींग लायसन्स इ.

**रहिवासी पुरावा**

- रेशन कार्ड, वीज बिल, मालमत्ता कर पावती, पाणीपट्टी पावती, गॅस कनेक्शन पुस्तक, टेलिफोन बिल, बँक पासबुक, इन्कम टॅक्स पावती.

- पुर्णपणे भरलेला फॉर्म कागदपत्रांसह आपल्या जवळच्या मतदान केंद्रात जमा करावा.

- फॉर्म जमा केल्यानंतर पावती घ्यायला विसरु नका.

नविन मतदार नोंदणीसाठी
**फॉर्म ६ भरा**

मतदार यादीतील नाव वगळण्यासाठी
**फॉर्म ७ भरा**

मतदार यादीतील नाव दुरुस्तीसाठी
**फॉर्म ८ भरा**

मतदार यादीतील नाव स्थलांतरीतसाठी
**फॉर्म ८ – अ भरा**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, जळगांव

मतदार हेल्पलाईन क्रमांक - १९५० | http://ceo.maharashtra.gov.in | Deo Jalgaon | Deo_Jalgaon | @Deo_Jalgaon | Deo_Jalgaon

महाराष्ट्र

शासन

**श्रीकांत देशपांडे**
प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी

अ.शा पत्र क्र. स्वीप - २०२१ / प्र.क्र. ४५४/२१/३३

सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई – ३२.

दिनांक: ०५ ऑक्टोबर, २०२१.

**विषय :- विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची प्रचार व प्रसिद्धी करण्याबाबत.**

प्रिय अभिजीत,

दिनांक २८ सप्टेंबर २०२१ रोजी आगामी महानगरपालिकांच्या व स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका आणि विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम केंद्रस्थानी ठेवून बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे, राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव किरण कुरुंदकर, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातील स्वीप सल्लागार दिलीप शिंदे आदी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये चर्चा करण्यात आलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने १ नोव्हेंबर २०२१ ते ३० नोव्हेंबर २०२१ या कालावधीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालये यांनी पुढील उपक्रमांचे नियोजन करावे :-

१. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि महानगरपालिका यांच्या निवडणुकांच्या दृष्टीने १ जानेवारी २०२२ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व नागरिकांच्या नावांचा मतदार यादीत समावेश करणे.
२. आपापल्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पात्र नागरिक मतदार यादीत नावे नोंदविण्यापासून वंचित असल्यास, त्यांचा शोध घेणे व त्यांना मतदार यादीत नावे नोंदविण्यासाठी प्रोत्साहित करणे.
३. दुबार नोंद असलेल्या, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे मतदार यादीतून वगळणे; तसेच पत्त्यातील बदल किंवा मतदार यादीतील अन्य तपशिलांची दुरुस्ती करणे, याबाबत जनजागृती करणे.
४. मतदार जागृती मोहिमेत महाविद्यालये, विद्यापीठे, विविध शासकीय विभाग/ संस्था, स्वयंसेवी संस्था, अराजकीय संस्था इत्यादींना सहभागी करून घ्यावे.
५. जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या स्तरावर पत्रकार परिषदा घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था आणि महानगरपालिका यांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत तपशिलावर माहिती देऊन मतदार नोंदणीबाबत नागरिकांना आवाहन करणे.
६. वृत्तपत्रांच्या स्थानिक आवृत्त्या, स्थानिक केबल वाहिन्या, सोशल मीडिया, डिजिटल मीडिया, मोबाइल एसएमएस, आकाशवाणी/एफएम केंद्रांवरून जाहिराती, चर्चासत्र, मुलाखती इत्यादींद्वारे जनजागृती करावी.
७. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय प्रायोजित आकाशवाणीवरील 'दिलखुलास' आणि दूरदर्शनवरील 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाद्वारे प्रसिद्धी करणे.
८. विविध वृत्तपत्रांच्या स्थानिक आवृत्त्यांमध्ये विविध मान्यवरांचे मतदार जागृतीसंदर्भात लेख प्रसिद्ध करणे.
९. राजकीय पक्षांशी संबंधित नसलेल्या सिनेमा, क्रीडा, संस्कृती, साहित्य इत्यादी क्षेत्रांतील मान्यवरांचे मतदार नोंदणीसंदर्भात आवाहन करणारे संदेश (व्हिडीओ) सोशल मीडियावरून प्रसारित करणे.
१०. जिल्हाधिकारी कार्यालये, नगरपरिषदा/नगरपंतायती आणि महानगरपालिका यांच्याकडून विविध कारणांसाठी देण्यात येणाऱ्या जाहिरातींच्या खाली मतदार नोंदणीसाठीच्या आवाहनाचादेखील समावेश करणे.
११. नागरिकांचे लक्ष वेधू शकणाऱ्या मोक्याच्या ठिकाणी पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिग्ज लावणे.
१२. मतदार नोंदणीबाबत प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, रेल्वे स्थानक, बस स्थानक, हॉटेल्स, मॉल्स इत्यादी ठिकाणी ठळक स्वरूपाचे बॅनर लावणे.
१३. एसटी बस आणि उपनगरीय रेल्वे गाड्यांमध्ये मतदार नोंदणीबाबत उद्घोषणा करणे.

१४. संबंधित विभाग/आस्थापनांशी समन्वय साधून सर्व प्रकारच्या देयकांवर खालील बाजूस थोडक्यात मतदार नोंदणीबाबत आवाहन करणे. उदाः पाणीपट्टी देयक, मालमत्ता कर देयक, वीज देयक, गॅस देयक, दूरध्वनी देयक इत्यादी.

१५. विविध शासकीय वाहनांद्वारेदेखील मतदार नोंदणीसाठी मतदार नोंदणीसाठी आवाहन करावे. उदा : घंटागाड्या व अन्य वाहने.

१६. राजकीय पक्षांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था आणि महानगरपालिका यांच्या आगामी निवडणुकांबाबत कल्पना देऊन मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत अवगत करणे.

१७. स्थानिक स्तरावरील स्वयंसेवी संस्थांच्या बैठका घेऊन त्यांना मतदार जागृती अभियानात सहभाग घेण्याबाबत आवाहन करणे.

१८. विविध महाविद्यालये, विद्यापीठे, तसेच गृहनिर्माण सोसायट्या यांमध्ये ऑनलाइन पद्धतीने किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून मतदार नोंदणीसाठी जागृती करणे.

१९. विद्यापीठ प्रशासन व विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या समन्वयातून १ जानेवारी २०२२ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेशाच्या वेळी किंवा प्रवेश झाला असला तरी मतदार यादीत नावनोंदणी करणे.

२०. विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये मतदार नोंदणी व जागृतीसाठी समन्वयकाची नियुक्ती करून त्याच्या नावासह मतदार नोंदणीबाबत ठळक स्वरूपात कॅम्पसमध्ये पोस्टर/बॅनर लावणे.

२१. एनसीसी, एनएसएस, स्काऊट अँड गाइड इत्यादींसारख्या उपक्रमांतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने मतदार जागृती करणे.

२२. विद्यार्थ्यांसाठी व खुल्या गटासाठी मतदार नोंदणी या विषयावर ऑनलाइन पद्धतीने निबंध, वक्तृत्व, वादविवाद, कथाकथन इत्यादी स्पर्धांचे आयोजन करणे.

२३. विविध गृहनिर्माण संस्थांच्या (विशेषतः नवीन गृहनिर्माण संस्था) पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून संबंधित संस्थांच्या आवारात विशेष शिबिरांचे (कॅम्प) आयोजन करणे.

२४. विविध सहकारी संस्था, बँका, साखर कारखाने, पतसंस्था इत्यादी ठिकाणी जनजागृती करणे.

२५. सर्व औद्योगिक व व्यावसायिक आस्थापनांच्या सर्व कर्मचाऱ्यांची मतदार नोंदणी करण्याच्या दृष्टीने संबंधितांशी संपर्क साधून अधिकाधिक मतदार नोंदणी करणे.

२६. महिला बचत गटांच्या माध्यमातून मतदार नोंदणीसाठी अर्ज उपलब्ध करून देणे आणि अधिकाधिक प्रमाणात मतदार नोंदणी व मतदार यादीतील आवश्यक त्या दुरुस्त्या करणे.

२७. शिधावाटप दुकानांवर शक्य असल्यास मतदार नोंदणीबाबतचे अर्ज उपलब्ध करून देणे व मतदार जागृतीसाठी फलक/बॅनर्स लावणे.

२८. नमूद केलेल्या मुद्द्यांव्यतिरिक्त आणखी काही कल्पक संकल्पना असल्यास त्याही आपापल्या स्तरावर राबविण्यात याव्यात.

२९. सोशल मिडिया कॅम्पेन राबवणे.

३०. नावनोंदणीसंदर्भातील उपक्रम राबवण्याबाबत आणि BLO च्या उपलब्धतेबाबत महापालिकेतील अधिकाऱ्यांशी समन्वय साधणे.

सदर कार्यक्रम मतदार नोंदणी अधिकारी यांनाही राबविण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

आपला स्नेहांकित,

(श्रीकांत देशपांडे)

प्रति,
श्री अभिजीत राऊत,
जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव,
महाबळ रोड, जिल्हा पेठ,
जळगांव ४२५ ००१.